# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31 / 05 / 2023 (बुधवार) सकाळ

---

### चोरीचा प्रयत्न

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा गुमथळा शिवार कामठी येथे दिनांक २९/०५/२०२३ चे २२/३० वा. ते २३/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविंद्र भीमराव काकडे, वय ३१ वर्ष, रा. गुमथळा ता. कामठी जि. नागपूर यांचे मौजा गुमथळा शेत शिवार येथील शेता जवळील सोनेगाव राजा रोडने फिर्यादीचा मित्र आपले स्वत:चे शेतात गेला असता लाल रंगाचा थ्री व्हीलर ऑटो व **दोन संशयित इसम नामे– १) राहुल शिवचरण कानेकर वय ३६ वर्ष, रा. मारोती सोसायटी पारडी नागपुर २) रवि पटोले, रा. गुमथळा ता. कामठी जि. नागपूर** दिसले तेव्हा त्यास संशय आल्याने त्याने जवळ जाण्याचा प्रयत्न केला असता एक इसम विहीरी वरील मोटर काढतांनी दिसुन आला जवळ गेले असता फिर्यादीच्या मित्राला बघुन संशयित पळुन गेला असे फिर्यादीच्या मित्रांनी फिर्यादीस फोन करून सांगितले फिर्यादी ही घरून येऊन आपल्या शेतीवर शाहनिशा केली असता संशयितांनी चोरी करण्याच्या उद्देशाने येऊन फिर्यादीचे विहीरीतील मोटर पंप चोरी करण्याचा प्रयत्न करतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा/४४२ भगवान चांदेवार मो. नं. ९७६५२२१११६ पोस्टे मौदा हे करीत आहे.

### अवैध रेतीचा साठा करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
### पोलीस स्टेशन पारशिवनीची कार्यवाही

पोस्टे पारशिवनी:– अंतर्गत ०५ किमी अंतरावर मौजा पालोरा शिवार येथे दिनांक ३०/०५/२०२३ चे ०६/३० वा. ते ०७/१५ वा. दरम्यान पोलीस स्टेशन पारशिवनी येथील स्टाफ पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे पारशिवनी हद्दीतील मौजा पालोरा शिवार येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीचा साठा साठवुन ठेवला आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून नमुद घटनास्थळी गेले असता कोणीतरी अज्ञात इसमाने इरफान पठाण यांचे वडीलोपार्जित असलेल्या पडीत जमीनीवर झाडाझुडपांमध्ये अंदाजे १० ब्रास अवैध रेतीचा साठा अंदाजे किंमती ५०,०००/–रू. व तेथुन पुढे गेल्यानंतर पेंच नदीचे पात्राला लागुन असलेल्या नागोरावजी काळे रा. नागपूर यांचे शेतामध्ये अंदाजे ३५ ब्रास अवैध रेतीचा साठा अंदाजे किंमती १,७५,०००/–रू. असा एकूण ४५ ब्रास रेती एकूण किंमती अंदाजे २,२५,०००/– रूपयाचा मुद्देमाल अवैधरित्या रेतीचा साठा मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– नापोशि राहुल तभाने ब. नं. २१०५ पो.स्टे. पारशिवनी यांचे रीपोर्ट वरून सदर प्रकरणी पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी मुंडे मो. क्र. ९४०३९५१२३६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर